**नवी मुंबई महानगरपालिका**

**महानगरपालिका सचिव कार्यालय, नवीन मुख्यालय, ३ रा मजला, बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक ०३/०२/२०१५.**

नवी मुंबई महानगरपालिकेची **फेब्रुवारी महिन्याची सर्वसाधारण सभा, मंगळवार, दिनांक १० फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता** बेलापूर, भुखंड क्रमांक ०१, सेक्टर १५ए, नवी मुंबई महानगरपालिका, नवीन मुख्यालय येथील ५ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

**१.** इतिवृत्त कायम करणे.
**२.** प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

**३.** नमुंमपा, समाज मंदिर, सी.बी.डी. से.३ व वाशी, से.३ सिडको काळापासून कार्यरत असलेल्या सामाजिक संस्थांना तात्पूरत्या स्वरुपात पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे.

**४.** सानपाडा सेक्टर ५ येथील उर्वरीत रस्त्यांचे डांबरीकरणाने सुधारणा करणे.

**५.** सीबीडी सेक्टर-८ बी येथील वासुदेव बळवंत फडके नमुंमपा शाळेसमोरील मैदानाची सुधारणा करणे.

**६.** सानपाडा सेक्टर १३, भू. क्र. ८ येथे ज्येष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र बाधणे.

**७.** तुर्भे प्र. क्र. ५७ सेक्टर १८ येथील मॅफ्को मार्केट व योगी हॉटेल समोरील गटारांची व पदपथांची सुधारणा करणे.

**८.** नमुंमपा हद्दीतील अडवली-भुतवली येथील आदिवाशी साठी घरकूले बांधणे

**९.** ठाणे-बेलापूर रस्त्यामधील दिघा नाका ते सॅन्डोज कंपनी पर्यंतच्या रस्ता रुंदीकरणात बाधित होणारे दुकान गाळे व मासळी मार्केट मधील ओटले निष्कासित करणे.

**ठरावाच्या सूचना :**

**१० ते १२. श्री. भोलानाथ महादू ठाकूर, यांजकडून :-**

**(१०)** प्र. क्र. १, शंकर मंदिर, अनंत नगर ते मुंकुंद कंपनी, ईश्वर नगरपर्यंत रस्त्यालगत असलेल्या फुटपाथ लोखंडी जाळी लावण्याची तरतूद करणे. **(११)** प्र. क्र. १, ईश्वर नगर विभागातील सर्व गटारावरील फ्रेम झाकण लावण्याची तरतूद करणे. **(१२)** प्र. क्र. १, ईश्वर नगर मधील स्वामी विवेदानंद शाळा ते राजेश सतरा दुकानापर्यंत व खारकर वाडी पदपथ आणि बालीनगर क्लस्टर नं. २१, देशमुख ताई घरामागे गटार व पदपथ बांधण्याची तरतूद करणे.

**१३ ते १५. श्री. चंद्रकांत रामदास पाटील, यांजकडून :-**

**(१३)** प्र. क्र. २२, महापे येथील अत्यंत गरजेची असलेली गटारे महापे गाव कै. रामदास पदाजी पाटील ते श्री. धनाजी सोगा साष्टे ते श्री गणेश मंदिरापर्यंत, महापे गाव मुळीक चाळ मधील सर्व गटारे, संभाजीनगर येथील शाळेच्या पटांगणा भोवतालच्या परिसरातील गटारे, महापे गाव श्याम तुंगे यांचे घरापासून ते सार्वजनिक शौचालयापर्यंत गटारे, अडवली-भुतवली गावातील शशिकांत खुलात यांचे शाळेच्या मागील घरापासून ते दंगली यादव यांचे घरापर्यंत गटारे दुरुस्ती करणे. **(१४)** प्र. क्र. २२, महापे मधील महापे गाव व अडवली-भुतवली गाव मधील अंर्तगत रस्ते दुरुस्ती व डांबरीकरण करणे. **(१५)** प्र. क्र. २२ महापे मधील अडवली-भुतवली गाव व संभाजी नगर वारली पाडा येथील स्मशान भुमी आहेत. त्यांची दुरुस्ती करुन बैठका टाकणे.

**१६ ते १८. सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-**

**(१६)** सानपाडा से. ५ मधील रहिवाशींकरिता नवी मुंबई महानपगरपालिकेने गावदेवी मैदान हा भुखंड सिडको कडुन घेतला असला तरी तो अपुरा पडत आहे. सदर भुखंडाला लागून असलेला भुखंड क्र. २० से. ४ सानपाडा हा आजही सिडकोच्या ताब्यात आहे. तरी सदर भुखंड हा संपुर्णता हस्तांतरीत करुन घेऊन सदर संपुर्ण गावदेवी मैदानाचे नव्याने सुशोभिकरण करणे.

**(१७)** सानपाडा विभागातील सिडको विकसित नोड से. ४ (श्री दत्तगुरु, कस्तुरी, सप्तपर्णी, अश्वथा सो.) बैठी चाळीतील रहिवाशीयांनी आपल्या गरजेपोटी काही अंशी वाढीव बांधकाम केले आहे. तरी सदर सर्व बांधकाम जैसे थे त्याच स्थितीत नियमित करुन त्यांना बांधकाम पुर्णत्वचा (O C) दाखला देणे. **(१८)** सानपाडा विभागातील बहुतांशी जुन्या बांधकामाच्या इमारतीतील रहिवाशी हे त्यांच्या छप्पर (terest) गलती मुळे त्रस्त आहेत. प्रशासन दरबारी त्यांनी पत्रव्यवहार केला असता त्यांना कायदेशिर परवानगी देण्यात येत नसल्यामुळे नाहीलाजस्तव हे सर्व इमारती धारक विनापरवाना आपल्या इमारतीच्या छतावर (terest) पत्रे टाकून आपल्या छताचे संरक्षण करीत आहेत. तरी अशी मागणी केलेल्या सर्व इमारतींना आपल्या छतावर (terest) नाममात्र शुल्क आकारुन कायदेशीर परवानगी देणे.

**१९ ते २१. सौ. सुरेखा रविंद्र इथापे, यांजकडून :-**

**(१९)** प्र. क्र. ८०, से.१९ अे नेरुळ येथील वंडरपार्क मधील ॲम्पीथिएटर समोरील तलाव व नाल्याजवळील तलावाची शेत तळ्याच्या पध्दतीने सुधारणा करणे. **(२०)** प्र. क्र. ८०, से.१९ अे येथे आम्रमार्ग कडून आतमध्ये जाणाऱ्या सर्व रस्त्यांची फॅनिग पध्दताने सुधारणा करुन प्रत्येक रस्त्याच्या एंट्रीवर शिल्प बसवून सुशोभिकरण करणे. **(२१)** प्र. क्र. ८०, से.१९ अे, नेरुळयेथील सफल कॉम्प्लेक्स ते नवदुर्गा सोसायटीच्या ट्रीबेल्ट खालील उद्यानात बेंचेस, गजेबो, लाईटस बसवून सुशोभिकरण करणे .

**२२ ते २४. श्री. बहादुर त्रिलोकसिंह बिस्ट, यांजकडून :-**

**(२२)** प्र.क्र. ५, इलठणपाडा, मधील एम.आय.डी.सी. रोड ते इलठणपाडा स्मशान भुमी पर्यंत चे कच्चे (आरिकाला पासुन) रस्ता डांबरी रस्ता बनविणे. **(२३)** सन २००० पर्यतच्या झोपड्यांना (नवी मुंबई क्षेत्रातील ) नवी मुंबई महानगरपालिका द्वारा घरगुती नळ कनेक्शन व नागरी सुविधा प्रदान करणे. **(२४)** सन २००० पर्यतच्या झोपड्यांना घरात शौचालय बनविण्याकरिता (न.मुं.म.पा क्षेत्रातील) ५० % अनुदान देणे.

**२५ ते २७. श्री. रंगनाथ कारभारी औटी, यांजकडून :-**

**(२५)** नमुंमपाच्या शाळेमध्ये शास्त्रीय संगित विषय चालू करणे. **(२६)** प्र. क्र. ६६ मध्ये सिडको कडून हस्तांतरीत झालेल्या भुखंडावर त्वरित समाज उपयोगी व्यायाम शाळा व महिला सक्षमीकरण महीला उद्योग भवन बांधणे. **(२७)** प्र. क्र. ६६ मधील उद्यान सुशोभिकरणासाठी नवीन पध्दतीचे कारंजे, आर्कषित खेळणी व इतर सोयी उपलब्ध करुन देणे.

**मा. महापौरांच्या आदेशावरून,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर)**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक ०३ फेब्रुवारी २०१५.**